रोख रक्कम हाताळण्याबद्दल विशेष वेतन मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक वेतन - १२९८/प्र.क्र. १६९/९८/सेवा-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक २३ डिसेंबर १९९८.

वाचाः- १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक एसएसपी-१२८८/७८/सेवा-१०, दिनांक १७ ऑक्टोबर १९८८.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक एसएसपी-१३८९/१०९/सेवा-८, दिनांक २१ मार्च १९९०.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेतन-१५९०/प्र.क्र. ८९/९०/सेवा-३, दिनांक ५ डिसेंबर १९९०.

४. केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकशिकायत तथा पेंशन मंत्रालयाच्या आस्थापना व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ४/५/९७-आस्थापना, दिनांक ५ मे १९९८.

शासन निर्णयः- पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने उपरोल्लिखित दिनांक ५ मे, १९९८ च्या आदेशान्वये केंद्र शासकीय कर्मचा-यांच्या रोख रक्कम हाताळण्यासंबंधातील विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करण्यात आली आहे. या आदेशाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या रोख रक्कम हाताळण्याकरिता देण्यात येणा-या विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, या संदर्भातील विशेष वेतनाचे सुधारित दर पुढीलप्रमाणे अंमलात येतील :-

| अ. क्र. | संवितरित मासिक सरासरी रोख रक्कम | विशेष वेतनाचा दरमहा दर |
|---|---|---|
| १. | रुपये ५०,००० पर्यंत | रुपये ७५ |
| २. | रुपये ५०,००० हून अधिक व रुपये २,००,००० पर्यंत | रुपये १५० |
| ३. | रुपये २,००,००० हून अधिक व रुपये ५,००,००० पर्यंत | रुपये २०० |
| ४. | रुपये ५,००,००० हून अधिक व रुपये १०,००,००० पर्यंत | रुपये २५० |
| ५. | रुपये १०,००,००० हून अधिक | रुपये ३०० |

२. या संबंधीच्या इतर सर्व अटी व तरतूद पूर्वीप्रमाणे राहतील.

३. हे आदेश दिनांक १ ऑक्टोबर १९९८ पासून अंमलात येतील.

४. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श.वि. लागवणकर,

शासनाचे उप सचिव.